प्रति, श्रीम. अंजली दमानिया

EN747983782IN IVR:6977747983782
SP BHANDUP IND ESTATE SO <400078>
Counter No:1 23/09/2024,10:30
To:ANJALI A DAMANIYA,SANTACRUZ
PIN:400055, Santacruz(East) S.O
From:NITIN B CHA,A M JAIN ESTATE
Wt:50gms
Amt:17.70,Tax:2.70,Amt.Paid:18.00(Cash)

द्वारा,
**श्री. नितीन व. चव्हाण**
ए. एम. जैन इस्टेट, 5/49, खालचा माळा,
विलेज रोड, भांडूप (प), मुंबई- 400078
# 9820451505

दिनांक: 23/09/2024

प्रति,

झी 24 तास चॅनल

EN747983805IN IVR:6977747983805
SP BHANDUP IND ESTATE SO <400078>
Counter No:1 23/09/2024,10:30
To:Z 24 TAS,LOWER PAREL
PIN:400013, Delisle Road S.O
From:NITIN B CHA,A M JAIN ESTATE
Wt:50gms
Amt:17.70,Tax:2.70,Amt.Paid:18.00(Cash)

TV9 न्यूज चॅनल

EN747983796IN IVR:6977747983796
SP BHANDUP IND ESTATE SO <400078>
Counter No:1 23/09/2024,10:30
To:TV P MARATHI NEWS ,PAREL
PIN:400012, Parel S.O
From:NITIN B CHA,A M JAIN ESTATE
Wt:50gms
Amt:17.70,Tax:2.70,Amt.Paid:18.00(Cash)

एबीपी माझा चॅनल

EN747983819IN IVR:6977747983819
SP BHANDUP IND ESTATE SO <400078>
Counter No:1 23/09/2024,10:30
To:A B P MAZHA NEWS ,ANDHERI EAST
PIN:400093, Chakala Midc S.O
From:NITIN B CHA,A M JAIN ESTATE
Wt:50gms
Amt:17.70,Tax:2.70,Amt.Paid:18.00(Cash)

## - कायदेशीर नोटीस -

मी वरीलप्रमाणे आपणास सदर नोटीसीद्वारे निदर्शनास आणून देतो कि,

1) तुम्ही दि. **16/08/2024** किंवा **17/08/2024** रोजी एक प्रेस कॉन्फरन्स घेतली ज्यात माझेविषयी जाणूनबुजून खोटे तसेच तुम्हाला माहित असलेले सत्य लपवून हेतूपरस्पर माझी समाजात बदनामी करणारे तसेच माझे सन्मान, जीवित व स्वातंत्र्य धोक्यात आणणारी विधाने एकतर्फारित्या केली, जी माझेजवळचे लोकांनी मला सांगितले व त्यानुसार मी ती Youtube वर सर्च करुन तपासली असता काही न्यूज़ चॅनलचे अधिकृत Youtube चॅनलवर ती मी पाहिली.

2) त्यानंतर त्वरित म्हणजे दि. **18/08/2024** रोजी मी त्यावर सडेतोड उत्तर देणारे व तुम्हाला याबद्दल open debates चे आव्हान देणारा मेसेज तुमचे मोबाईल नंबरवर व्हाट्सअप द्वारे पाठवला, यावर मी विचारलेल्या गंभीर प्रश्नांवर उत्तर देण्यापासून व open debates चे माझे आव्हानास नकार देऊन तुम्ही मला व्हाट्सअप वर Block करुन पुन्हा एकप्रकारे माझेपासून पलायन केले.

3) या मागची थोडक्यात पार्श्वभूमी अशी कि -

i) माझे म्हणणे हे कि तुम्ही, तुमचे पती श्री. अनिश दमानिया, नणंद नेहा दमानिया, वनिता अहलुवालिया, स्वीटू मेहता हे पाच पार्टनर मुंबई कुळकायद्याचे कलम 63 चा सर्रास भंग करून शेतकरी असल्याचा कोणताही पुरावा, कृती व प्रमाणपत्र नसताना रायगड जिल्ह्यात माणगाव व विशेषत: कर्जत तालुक्यात स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी त्यांना फसवून स्वस्तात खरेदी करणे व

द्वारा,
**श्री. नितीन ब. चव्हाण**
ए. एम. जैन इस्टेट, 5/49, खालचा माळा,
विलेज रोड, भांडूप (प), मुंबई- 400078
# 9820451505

दिनांक: . .2024

प्रति,

# - कायदेशीर नोटीस -

मी वरीलप्रमाणे आपणास सदर नोटीसीद्वारे निदर्शनास आणून देतो कि,

1) तुम्ही दि. **16/08/2024** किंवा **17/08/2024** रोजी एक प्रेस कॉन्फरन्स घेतली ज्यात माझेविषयी जाणूनबुजून खोटे तसेच तुम्हाला माहित असलेले सत्य लपवून हेतूपरस्पर माझी समाजात बदनामी करणारे तसेच माझे सन्मान, जीवित व स्वातंत्र्य धोक्यात आणणारी विधाने एकतर्फारित्या केली, जी माझेजवळचे लोकांनी मला सांगितले व त्यानुसार मी ती Youtube वर सर्च करुन तपासली असता काही न्यूज चॅनलचे अधिकृत Youtube चॅनलवर ती मी पाहिली.

2) त्यानंतर त्वरित म्हणजे दि. **18/08/2024** रोजी मी त्यावर सडेतोड उत्तर देणारे व तुम्हाला याबद्दल open debates चे आव्हान देणारा मेसेज तुमचे मोबाईल नंबरवर व्हाट्सअप द्वारे पाठवला, यावर मी विचारलेल्या गंभीर प्रश्नांवर उत्तर देण्यापासून व open debates चे माझे आव्हानास नकार देऊन तुम्ही मला व्हाट्सअप वर Block करुन पुन्हा एकप्रकारे माझेपासून पलायन केले.

3) या मागची थोडक्यात पार्श्वभूमी अशी कि -

   i) माझे म्हणणे हे कि तुम्ही, तुमचे पती श्री. अनिश दमानिया, नणंद नेहा दमानिया, वनिता अहलुवालिया, स्वीतू मेहता हे पाच पार्टनर मुंबई कुळकायद्याचे कलम 63 चा सर्रास भंग करुन शेतकरी असल्याचा कोणताही पुरावा, कृती व प्रमाणपत्र नसताना रायगड जिल्ह्यात माणगाव व विशेषत: कर्जत तालुक्यात स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी त्यांना फसवून स्वस्तात खरेदी करणे व

त्या बिगरशेती (N.A.) करुन प्लॉटिंग करुन इतर बाह्य शहरी लोकांना सुमारे शंभरपट भावात विकणे हा अनैतिक धंदा भ्रष्टाचाराच्या मार्गाने महसूल अधिकाऱ्यांच्या साथीने सन 2006 ते सन 2012 चे दरम्यान करत होता. त्यात तुम्ही कोट्यवधी रुपये अल्पकाळात कमावले.

ii) तुमच्या अशाप्रकारच्या सदर जमीनींपैकी सुमारे 30 एकर जमिनी या तेथील कोंढाणे धरण प्रकल्पात संपादित होणार तसेच तुमच्या अशाप्रकारच्या सुमारे 50 एकर जमिनी या कर्जत तहसीलदार मार्फत चौकशी होऊन शासनजमा होणार याची चाहूल लागताच त्या जमिनी पुढे भविष्यात महाराष्ट्र रेव्हेन्यू ट्रीब्यूशनल (MRT) मध्ये वाचवण्यासाठी तसेच तुम्हा पाच पार्टनर लोकांवरील संभाव्य अटकेची कारवाई ही टाळण्यासाठी लागणारे राजकीय वजन प्राप्त करण्यासाठीच तुम्ही माझ्यासारखे हजारो सामान्य लोकांनी एप्रिल 2011 पासून स्वतःचे सर्वस्व खर्च करुन निस्वार्थपणे उभे केलेल्या जनलोकपाल आंदोलनात, त्यांचे संयोजन करणाऱ्या इंडिया अगेंस्ट करप्शन म्हणजेच IAC मध्ये काही नेत्यांना मॅनेज करुन अचानक ऑगस्ट 2011 मध्ये आलात व अचानक नेत्या बनल्या. त्याचवेळी प्रीती शर्मा मेनन याही IAC मध्ये आल्या. तुमच्या या कटाची किंचित चाहूल व संशय आल्याने मी तुमचे या कृत्यावर प्रश्नचिन्ह उभे करत होतो, या गोष्टीचा तुम्हाला, IAC चे मुंबईस्थित नेते श्री. **मयांक गांधी, प्रफुल वोरा, प्रीती शर्मा मेनन** यांचा माझेबद्दल आकस होता.

iii) त्याचवेळी योगायोगाने आमचे विभागातील काही पीडित लोकांचे मागणीनुसार मी IAC चे संयोजक श्री. अरविंद केजरीवाल यांचे सहमतीनुसार तसेच श्री. मयांक गांधी, नरेश ठाकूर यांच्याशी चर्चेनुसार मी आमचे विभागातील गंभीर फौजदारी गुन्हेंचा रेकॉर्ड असलेले काही नामी रॉबर गुंड जे विभागात **झोपडीदादा** बनून लोकांवर त्यांचे घरांचे बांधकामविषयी **दादागिरी** तसेच मोकळ्या जागा बळकावण्यासाठी **दहशत** करायचे, लोकांचे दुकान खाली करण्यासाठी त्यांचे पाण्याचे नळ कापायचे अशा लोकांविरुद्ध कायदेशीरित्या लढत होतो. त्यावेळी त्यांचे ऑफर्स मी ठोकरत होतो. हे पाहून त्यांनी चकाला येथील IAC चे ऑफिसमध्ये येऊन मयांक गांधी, प्रफुल वोरा, प्रीती मेनन व तुम्ही अशांना मार्च 2012 मध्ये संपर्क केला व त्यानंतर पुढे तुम्ही सर्वांनी मिळून माझ्यावर खोटी पोलीस केस रचनेचा व माझे दुष्प्रचार व खच्चीकरण करण्याचा **कट** तयार झाला.

v) सदर कटानुसार तुम्ही लोकांनी "इंडिया अगेन्स्ट करप्शन" चे लेटरहेडद्वारे अनेक वेळा खोटी व दिशाभूल करणारी अनेक पत्रे जारी केली ज्यामुळे माझेविरुद्ध खोटे पोलीस केस रचनेची कहानी व इतर दुष्प्रचार हे रचले गेले. सदर कटानुसार **एप्रिल 2012** मध्ये आमच्यासोबत विभागात IAC चे काम करणारे श्री. राजा जोसेफ याला जीवघेणा मारहाण करुन त्याला त्या झोपडीदादा गुंडांनी भांडुप पोलीस ठाण्यास नेले व त्यास सोडवायला गेलो असता हमीद सरवैया व माझेवरच सदर गुंडांकडून

आम्ही खंडणी मागितल्याची **बनावटी केस** रचून त्यात माझा डावा हात निकामी होईपर्यंत **थर्ड डिग्रीत** मारण्यात आले. पण तरीही सदर गुंडांना तुम्ही लोकांनी अनेकदा IAC चे ऑफिस व मिटींगला बसवले, त्यांच्यासोबत फिरला, त्यांचे उदात्तीकरण करुन माझाच दुष्प्रचार व खच्चीकरण केले व या अत्याचाराच्या घटनाक्रमात माझी 7 महिन्याची **मुलगी ही दगावली**. याबद्दल माझी मा. मेट्रोपॉलिटीन कोर्ट, मुलुंड येथे **श्री. अरविंद केजरीवाल, कुमार विश्वास** यांविरुद्ध तुम्हा सर्वांच्या नमूद सहभागांचा उल्लेख असलेल्या केसेस क्र. **29/sw/2016** व **30/sw/2016** या प्रलंबित असून त्या मी आपल्या प्रतिकूल हालांमध्येही कसेबसे लढत आहे.

v) मुद्दा क्र. 3 मधील उपमुद्दा क्र. i व ii मध्ये वर्णिलेला तुम्हा लोकांचा जमीन घोटाळा व भ्रष्टाचार यांची मी अधिकृतकृत्या प्राप्त दस्त पुराव्यांसह दि. **14/10/2013** रोजी मुख्यमंत्री व महसूल मंत्रालयात फौजदारी तक्रार केली.

तसेच त्यानंतर तुम्ही लोकांनी नमूदनुसार नियोजितपणे आमच्या आंदोलनाचा वापर करुन आपल्या राजकीय व आर्थिक वजनाचा वापर करुन सन **2015** मध्ये चुपचापपणे महसूल प्राधिकरणात म्हणजेच MRT मध्ये आपले बाजूने एकतर्फा निर्णय लावून घेऊन कर्जत तहसीलदारमार्फत नमूद शासनजमा झालेल्या जमिनी या पुन्हा प्राप्त केल्या व ही बाब IAC कार्यकर्त्यांपासून लपवून ठेवली. सदरबाबतही अधिकृतरित्या प्राप्त पुराव्यांसह मी दि. **02/06/2016** रोजी पुन्हा मुख्यमंत्री व महसूल मंत्रालयास तक्रार केली. या तक्रारी व त्यांचा प्रचार केल्याचाही तुमचे मनात माझ्याबद्दल प्रचंड राग होता.

vi) तसेच याव्यतिरिक्त तुम्ही व तुमचे पती श्री. अनिश दमानिया हे नमूद जमीन घोटाळ्यातील जमीनविक्रीचा काळा पैसा हा तुमचे ड्रायव्हर श्री. **मकरंद धामनीसकरचे** खात्यावर घ्यायचे तसेच वरळीहून कारची डिक्की भरभरुन कॅश घरी आणायचे इत्यादी तुमचे **मनी लॉंडरिंग, टॅक्सचोरीचे** गंभीर गुन्हे हे मकरंद यांनी उजेडात आणायची धमकी व्हाट्सअप द्वारे तुम्हा दोघांना **जुलै 2019** मध्ये देताच तुम्ही लोकांनी तुमचे राजकीय वरदहस्तांच्या जोरावर एखाद्या दबंग गुंडासारखे वाकोला पोलीस ठाण्यातील काही भ्रष्ट पोलिसांच्या संगममताने मकरंद यांना बेकायदेशीररित्या दोन दिवस पोलीस ठाण्यात **detain** व **interrogation** केले, त्याचे मोबाईल बेकायदेशीररित्या हाताळले तसेच यामुळे त्यांनी विष पिऊन आत्महत्याचा प्रयत्न केल्याने स्वतःला याप्रकरणी वाचवण्यासाठी मकरंद यांनाच पोलिसांकरवी खंडणी व ब्लॅकमेलिंगची खोटी केस रचून अटक करवली.

यावेळी विशेष गंभीर बाब म्हणजे **नोव्हेंबर 2017** मध्ये स्वतःच्या राजकीय स्टंटसाठी एका माजी मंत्र्यावर झीरो FIR होण्यासाठी दोन दिवस आपल्या 50 कार्यकर्त्यांसह त्याच वाकोला पोलीस

स्टेशनला आंदोलनाचे स्टंट करणाऱ्या तुम्ही याप्रकरणी गरज नसताना मकरंद यांसोबत एका विवाहित महिलेचे अनैतिक संबंध हे मकरंदविरुद्ध रचलेल्या नमूद केसमध्ये तुम्ही दाखवले तसेच या केसमध्ये गरज नसताना त्या महिलेची पोलीसकरवी FIR नोंद होण्यापूर्वीच स्टेटमेंट घेतली जाते जेणेकरुन मकरंद यांना पोलीस केसचे भयसोबत समाजात बदनामीचेही भय असावे व तो तुमच्या नमूद आर्थिक गुन्ह्यांमध्ये कायमचा गप्प राहावा. अशाप्रकारे त्या गरीब विवाहित महिलेचाही तुम्ही लोकांनी तुमच्या स्वार्थासाठी याप्रकरणी अशाप्रकारे फौजदारी मानहानी व विनयभंग केला. याही संपूर्ण प्रकरणाची मी अधिकृतरित्या प्राप्त दस्त पुराव्यांसह तक्रार दि. **15/04/2024** रोजी मा. हायकोर्ट, पोलीस उपायुक्त- झोन-8, ED, CBI यांना तसेच पुन्हा हिंदी भाषेत स्मरणपत्र दि. **08/08/2024** रोजी ED, मुंबई तसेच आयकर विभाग, मुंबई यांना केली. सदर प्रकरणामुळे तुम्ही कोणी समाजसेवी नसून एक दबंग माफीयायी गुंड साबित होता तसेच तुमचे राजकीय वरदहस्तांचा पाठिंबा हटल्यास याही प्रकरणी तुम्हाला PMLA ॲक्टअन्वये अटकही होते याची तुम्हाला जाण आहे. म्हणूनच तुमचा याहीमुळे माझ्यावर प्रचंड राग आहे.

vii) याव्यतिरिक्त मी वर नमूद दि. 14/10/2013, दि. 02/07/2016, दि. 15/04/2024 रोजीच्या तक्रारी जोडून पुन्हा एक संयुक्त तक्रार ही दि. **30/04/2024** रोजी महसूलमंत्र्यांना केली.

viii) तसेच वरील सर्व मुद्दे घेऊन दि. **22/05/2024** रोजी मी कर्जतमधील तुमचेपासूनचे पीडीत शेतकऱ्यांसोबत मुंबई मराठी पत्रकार संघ येथे जाहीर प्रेस कॉन्फरन्स घेतली ज्यात त्या पिडीत शेतकऱ्यांनी जाहीररित्या 'तुम्ही कसे खरवंडी गावात त्या गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकरी नसतानाही खोटे बोलून स्वस्तात खरेदी केल्या व त्यास NA करुन प्लॉटिंग करुन शंभरपट भावात इतर बाह्य शहरी लोकांना बंगले बांधण्यासाठी विकल्या जिथे कधीकधी रात्रीचे नाचगाणे, धिंगाणा चालू असतो ज्याचा त्या ग्रामस्थांना त्रास होतो व त्या जमिनीतून त्या गरीब आदिवासी, दलित ग्रामस्थांचा त्यांचे जुने स्मशानाकडे जाण्याचा रस्ता हा **कब्जा** केला' हेही सांगितले. हे कोणीही सामाजिक कार्यकर्ता असले **अनैतिक** व **अशोभनीय** कार्य करत नाही. याही पोलखोलचा तुमचा माझ्यावर प्रचंड राग होता.

ix) दि. **29/05/2024** रोजी वरील सर्व बाबी मांडून पुन्हा मी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना तक्रारनिवेदन देऊन त्याद्वारे आगाऊ सत्याग्रहाची पूर्वसूचनाही दिली.

x) दि. **02/07/2024** रोजी वरीलबाबत मी मा. हायकोर्ट, मुख्यमंत्री, सर्व उपमुख्यमंत्री, आमदार, खासदार, पक्षप्रमुख, नेते, मीडिया अशा शेकडो लोकांना संयुक्त तक्रारही केली तसेच रायगड जिल्हाधिकारी यांना दि. **31/07/2024** रोजी व अँटीकरप्शन ब्युरोला दि. **13/08/2024** रोजी तुम्हा

लोकांचा नमूद जमीन घोटाळा, भ्रष्टाचार तसेच मनी लॉन्ड्रींगच्या नमूद तक्रारी केल्या, याचाही तुमचा माझ्यावर प्रचंड राग होता.

xi) तुमचे राजकीय वरदहस्त व काही न्यूज चॅनल, मीडियाचे जोरावर स्वतःला सामाजिक कार्यकर्ता, आयरन लेडी वगैरे दाखवण्याचे सोंग पाहून महाराष्ट्राच्या सामान्य लोकांची फसवणूक होवू नये म्हणून जनहितार्थ मी तुम्हाला याआधीच दि. 05/03/2024 रोजी वरील नमूद तुमचे सर्व फौजदारी व नैतिक गुन्हे, घोटाळे, भ्रष्टाचार, फसवणूक व क्रुरतेचे वर्णन करणारे **A ते H** असे मुद्देसूद **75** प्रश्न विचारणा करणारे 25 पानी पत्र हे 145 पानी संबंधित दस्त पुराव्यांसह पोस्टाने पाठवले जे तुम्हाला दि. **06/03/2024** रोजी प्राप्त झाले, त्याचा INDEX तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | मुद्दा | पान क्र. |
|---|---|---|
| A. | एप्रिल 2014 मध्ये तुम्हाला RPAD ने पाठवलेली बारा प्रश्न्न | 4 ते 5 |
| B. | कर्जत मधील जमीन घोटाळे व इतर विषयी 19 प्रश्न | 5 ते 10 |
| C. | तुम्ही केलेल्या सिंचन घोटाळाबद्दलच्या PIL विषयी 5 प्रश्न | 10 ते 11 |
| D. | MRT मधून तुम्हा लोकांची शासनजमा झालेली जमीन परत मिळणेविषयी 4 प्रश्न | 11 ते 12 |
| E. | तुम्ही, AAP ने छगन भुजबळ व इतर यांविरुद्ध मा. हायकोर्टात केलेल्या केसविषयी 2 प्रश्न | 13 |
| F. | तुम्हा लोकांचे राजकीय संबंध व मैत्रीबाबत 6 प्रश्न | 13 ते 14 |
| G. | तुम्हा लोकांचे अण्णा हजारेजी, अरविंद केजरीवालजी, विशंभर चौधरी यांनी केलेले उद्दात्तीकरणाविषयी 2 प्रश्न | 14 ते 15 |
| H. | सन 2012 पासून आजपर्यंत माझे, माझे कुटुंबावर तुम्ही लोक, रेकॉर्डेड चोर-माफिया, क्रूर भ्रष्ट पोलीस या Nexus ने खोट्या पोलीस केसेसमध्ये हात निकामी होईपर्यंत मारवणे, 7 महिने की मुलगी दगावणे, माझा दुष्प्रचार करणे इ. बद्दल 25 प्रश्न | 15 ते 25 |

हे 170 पानी पत्र हे **अण्णा हजारेजी, अरविंद केजरीवालजी, प्रीती मेनन शर्मा** या लोकांनाही त्यांनी या पत्रातील त्यांच्याशी संबंधित गंभीर आरोपांचे उत्तर द्यावे यासाठी त्यावेळीच त्यांच्यापर्यंत पोस्टाने तसेच ईमेल द्वारे पोहोचवले व त्यांना प्राप्त आहे व त्यांच्याकडून अद्याप काहीही उत्तर आलेले नाही. या पत्रातील एकाही मुद्द्यावर वा प्रश्नावर तुमच्याकडे **काहीच उत्तर नाही** व हे सर्व आरोप तुम्हाला **मान्य** आहेत म्हणून मीडियात सामाजिक कार्यकर्ता असलेचे प्रायोजित अभिनय करणारे तुम्ही यावर काहीच उत्तरे देऊ शकला नाहीत.

विशेष म्हणजे या पत्रात H मुद्द्यांमध्ये प्रश्न क्र. 25 मध्ये मी स्पष्ट नमूद केले आहे की तुम्ही, प्रीती शर्मा मेनन, मयांक गांधी हे सर्व लोक संपूर्ण मुद्दा क्र. 3 मध्ये नमूदनुसार तुम्हा लोकांविरुद्धचे सर्व फौजदारी तक्रारी व आरोप मान्य असल्याने कसे 2012 पासून तब्बल 15 वेळा माझेपासून सर्वांसमोर पलायन केलेले आहे. यामध्ये **सन 2012** मध्ये कसे तुम्ही मला समझोत्याचे **SMS** पाठवले,, कसे **सन 2013** मध्ये मी तुमचे कर्जत जमीन घोटाळ्याची पोलखोल केली त्याची न्यूज **एबीपी माझा** न्युज चैनलवर प्रसारित होऊनही तुम्ही **निरुत्तर व गप्प** बसलात,, कसे **सन 2013** मध्ये तुम्ही लोक रालेगणसिद्धीमधून मला व माझे पीडित पत्नीला पाहून तुम्ही, मयांक गांधी, प्रीती शर्मा मेनन, कुमार विश्वास यांनी पलायन केले त्याची बातमी वृत्तपत्रात येऊनही तुम्ही लोक **निरुत्तर व गप्प** बसलात,, कसे **फेब्रुवारी 2019** मध्ये **Tv 9 न्यूज** चॅनलवर पुन्हा मी तुमचे कर्जत जमीन घोटाळ्याची पोलखोल करुनही तुम्ही त्यावर **निरुत्तर व गप्प** बसलात,, कसे **एप्रिल 2014** मध्ये आम्ही तुमचे नमूद जमीन घोटाळा व माझ्याविरुद्ध झालेले नमूद करून अत्याचारांबद्दल नागपूरमध्ये घेतलेल्या प्रेस कॉन्फरन्सची बातमी सर्व वृत्तपत्रात प्रसारित होऊनही तुम्ही तेथील लोकसभा उमेदवार असूनही **निरुत्तर व गप्प** बसलात ज्यामुळे तुमचे deposite जप्त झाले तसेच त्याचवेळी तुम्हाला नमूद 12 प्रश्ने पाठवली त्यावरही तुम्ही गप्प बसला,, कसे **सन 2015** मध्ये आम्ही वरळीला आंदोलन करत असताना **इंडिया न्यूजचे** पत्रकाराने थेट तुम्हाला व प्रीती शर्मा मेनन यांना माझ्याशी खुले डिबेटचे आव्हान दिल्यावर तुम्ही ते नाकारले,, कसे मी अनेकदा तुम्हाला twitter मधील पोस्टमध्ये तुमची नमूदप्रमाणे पोलखोल करणारे comment केले ते पाहून त्यावर काहीच उत्तर नाही म्हणून तुम्ही मला यावर block करून एकप्रकारे पलायन केले, अशाप्रकारचे पलायनचे तुमचे अनेक उदाहरणे आहेत.

xii) दिनांक **05/07/2024** रोजी माझे तुमचेविरुद्धचे नमूद सर्व फौजदारी तक्रारींवर काहीच कारवाई होत नसल्याबद्दल आम्ही अधिवेशनकाळात विधानसभेवर आक्रोश आंदोलन ही केले ज्याचा व्हिडिओ हा **Nationalism** न्यूज चॅनलने त्यांचे twitter द्वारे तुमचेविरुद्ध माझ्या सर्व नमूद तक्रारी व प्रेस कॉन्फरन्सची Link सहित प्रसारित केला ज्याला कोट्यावधी लोकांनी पाहिला. आपले नमूद भ्रष्टाचारांचे न्यूज कोट्यावधी लोकांनी पाहिल्याचे पाहून व्यथित होऊन तुम्ही सदर न्यूज चॅनलच्या सदर twitter वर सार्वजनिकरित्या comment मध्ये त्याचे उत्तर देणे ऐवजी ते टाळून तुम्ही त्यांचे inbox मध्ये त्यांना वैयक्तिकरित्या विचारले कि 'कोणत्या माहितीचे आधारे तुम्ही हे tweet केले.' यावेळीही तुम्ही निरुत्तर व गप्प बसला. तसेच तुमचे एक समर्थकामार्फत माझे एक महत्त्वाचे सहकारीला माझेपासून फितूर करण्याचा प्रयत्नही केला.

4) वरीलप्रमाणे एवढ्या घटना स्पष्टपणे घडलेल्या असतानाही गेली 12 वर्षांपासून तुम्ही कधीच माझ्याशी आमने-सामने डिबेट्स-चर्चा करण्याची, माझे नमूद तक्रारी व आरोपांवर उत्तर देण्याची हिंमत दाखवली नाही

पण आज एक राजकारणी व्यक्ती माझे एका तक्रारीचा हवाला देऊन फक्त एक tweet करतो म्हणून तुमचे राजकीय वरदहस्तांचे इशाऱ्यावर तुम्ही **"खोटे बोला पण रेटून बोला"** या म्हणीप्रमाणे नमूदप्रमाणे माझेविरुद्ध मीडियामध्ये हेतूपरस्पर खोटे, बदनामीकारक, दिशाभूल करणारे कथन व विधाने करून माझे नेहमीप्रमाणे खच्चीकरण, बदनामी, चारित्र्यहनन केले व माझे सन्मान, जीवित व स्वातंत्र्यास धोका उत्पन्न केला आहे, तो माझे पाहणीनुसार असा आहे --

| पाहणी क्र. | न्यूज चैनलचे Youtube नाव | Youtube Video चा दिनांक व कालावधी | माझेविरुद्ध बदनामी केल्याचा टाइमिंग | दि. 22/09/2024 पर्यंत views |
|---|---|---|---|---|
| 1) | झी 24 तास | 17/08/2024, 15:43 min | 8:30 ते 9:00 min | 3.1 लाख |
| 2) | Tv 9 मराठी | 17/08/2024, 23:36 min | 10:00 ते 13:00 min | 23 हजार |
| 3) | एबीपी माझा | 17/08/2024, 22:17 min | 14:00 ते 17:30 min | 6.7 लाख |

(तसेच जे माझे पाहणीमध्ये अद्याप आले नाही तेही न्युज चॅनल व मीडिया)

i) तुमचे विधान- ***"...सुरत चव्हाण यांनी ट्विट केले कि नितीन चव्हाण नावाचे माणसाने माझी ED व CBI मध्ये कंप्लेंट केली कि माझा जो इन्कम स्त्रोत आहे तो काय आहे?..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे हे कि- सदर विधान हे तुम्ही हेतूपरस्पर जाणूनबुजून खोटे बोलला आहात. तुम्ही मुद्दा क्र. **3, xii)** मध्ये नमूदनुसार माझी सदर नमूद तक्रार ही वाचली आहे ज्यात मी तुमचा इन्कम स्त्रोत काय आहे हा प्रश्न विचारलाच नसून सदर तक्रार ही त्याहीपेक्षा गंभीर व तुम्हाला, तुमचे पतीला अटकेची कारवाई होईल अशी आहे ज्याचे वर्णन हे मुद्दा क्र. **3, vi)** मध्ये आहे. तुम्ही हे सर्व माहीत असूनही मीडियात व लोकांसमोर हेतुपरस्पर लपवून ठेवले व सदरप्रमाणे खोटे बोलले. तरी पत्रकारांनीही तुम्हाला यावर एक प्रश्नही विचारला नाही हे नियोजित वाटते.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात यावर तसेच अशाप्रकारे साक्षीदार संरक्षण कायदा (witnesse protection act/scheme) यांचेही फौजदारी भंग केला आहे यावरही पुराव्यांसह स्पष्टीकरण मला द्यावे.**

ii) तुमचे पुढील विधान- ***"...मुलांना व नवऱ्याला मध्ये घेतले ना तर साफ सोडणार नाही तुम्हाला..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे हे कि- सदर विधान हे तुम्ही सुरज चव्हाण यांच्यासाठी केले असे दाखवले असले तरी संपूर्ण **मुद्दा क्र. 3** मध्ये नमूदनुसार मी तुम्ही, तुमचे पती व इतर यांविरुद्ध गेली 12 वर्षांपासून आजपर्यंत अधिकृतरित्या प्राप्त पुराव्यांसह ज्या गंभीर फौजदारी तक्रारी केल्या ज्यांवर

तुमचे राजकीय वरदहस्तांमुळे काहीच कारवाई झाली नाही त्या तक्रारींवर जर भविष्यात FIR व निष्पक्ष चौकशा झाल्या तर तुम्हा सर्व दोषींवर अटकेची तसेच नमूद जमिनी या पुन्हा शासनजमा होवून त्या शेतकऱ्याना परत करणेची कारवाई होऊ शकते याची शक्यता असल्याने तुमचा व तुमचे मास्टरमाईंड असलेल्या तुमचे पतीला माझ्यावर प्रचंड राग आहे व या रागापोटी साक्षीदार संरक्षण कायद्याचा फौजदारी भंग करत माझे सन्मान, जीवित, मालमत्ता व स्वातंत्र्य यांना धोका निर्माण करून मला धमकावण्यासाठी तुम्ही सदर विधान केले आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात तुम्ही यावर स्पष्टीकरण द्यावे.**

iii) तुमचे पुढील विधान- ***"...2011 पासून इंडिया अगेंस्ट करप्शन मध्ये तो व्यक्ती यायचा..."***

यावर माझे आक्षेप व म्हणणे असे कि- सदर विधान तुम्ही चुकीच्या पद्धतीने व अगदी हेतुपरस्पर खोटेपणाने, लोकांची माझेप्रती दिशाभूल करण्यासाठी मांडले आहे.

इंडिया अगेंस्ट करप्शन चे जनलोकपालसाठीचे एप्रिल 2011 मधील पहिले राष्ट्रीय आंदोलनापासून मी त्याचा समर्पित प्रचारक कार्यकर्ता होतो. मुंबईतील आंदोलनात इंडिया अगेन्स्ट करप्शन मार्फत लोकांना वाटल्या गेलेल्या 50 हजार पत्रकांचे लिखाण माझ्याकडून केले गेले होते. दर शनिवारी होणाऱ्या इंडिया अगेंस्ट करप्शनचे मीटिंगमध्ये माझेही भाषणे व्हायची. मी माझे विभागीय IAC कार्यकर्त्यांची दर रविवारी मीटिंग घ्यायचो ज्यात कधी IAC चे मुंबई संयोजक असलेले मयांक गांधी हेही यायचे. चकालास्थित IAC चे कार्यालयाच्या पत्त्यावर माझ्यासाठीची पत्रे यायची. म्हणजेच मी इंडिया अगेंस्ट करप्शन चा एक महत्त्वाचा **प्रचारक व ऑफिस बेरर** होतो व हे कार्य मी गरीब असूनही देशभावनेने **स्वतःचे वेळ, पैसा, बुद्धी, व मेहनत खर्ची करुन निस्वार्थपणे** करत होतो याचे भान ठेवावे.

याउलट तुम्ही या इंडिया अगेंस्ट करप्शन मध्ये पहिलेपासून **नव्हताच**. तुम्ही कसे स्वतःचे नमूद जमिनी व स्वतःवरील अटकेची कारवाईपासून स्वतःला वाचण्यासाठी **कट** रचून या आंदोलनात व इंडिया अगेंस्ट करप्शन मध्ये चार महिने उशिराने अचानक देशभक्त बनून आलात व सामाजिक कार्यकर्ता बनल्या त्याचे वर्णन मुद्दा क्र. **3, i) व ii)** मध्ये आधीच केलेले आहे. हा सर्व घटनाक्रम तुम्हास माझ्याकडून दि. **06/03/2024** रोजी प्राप्त 75 प्रश्नांचे पत्रात B मुद्द्यामध्येही आहे जे सत्य असल्याने तुम्ही त्याचे काहीच उत्तर दिलेले नाही.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात यावर पुराव्यांसह स्पष्टीकरण द्यावे.**

iv) तुमचे पुढील विधान- ***"...इंडिया अगेंस्ट करप्शन चे लेटर हेड वापरुन तो त्यांच्याकडून (बिल्डरांकडून) खंडणी वसूल करायचा..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे कि- संपूर्ण मुद्दा क्र. 3 मध्ये नमूदनुसार तुम्ही व इतर या लोकांविरुद्ध गंभीर फौजदारी तक्रारी केल्यामुळे व त्या सर्व तुम्हाला नमुदनुसार ज्ञात असल्यामुळे तसेच तुम्हास माझ्याकडून प्राप्त नमूद **A ते H** असे 75 प्रश्नांचे पत्र प्राप्त असूनही साक्षीदार संरक्षण कायद्याचा फौजदारी भंग करत तुम्ही हे विधान माझे बदनामी, खच्चीकरण तसेच माझे सन्मान जीवित व स्वातंत्र्यास धोका पोहोचवणे तसेच मला धमकावण्यासाठी परस्पर खोटे, बनावटी व लोकांची माझेप्रति दिशाभूल करण्यासाठी केलेले आहे.

मुद्दा क्र. **3 मधील iii) व iv)** मध्ये नमूद झोपडीदादा गुंडे यांच्या संगनमताने तुम्ही लोकांनी नमूदप्रमाणे माझ्यावर पोलीस केस व अत्याचार घडवले त्याच झोपडीदादा गुंडांना तुम्ही या विधानात **'बिल्डर'** असे संबोधले आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात तुमचे या विधानानुसार मी कोणते लेटरहेड वापरले ते दाखवावे तसेच सदर लेटरहेड वापरून मी तुमचे त्या कथित बिल्डरकडून खंडणी वसूल करायचो याचे तुमच्याकडे जे पुरावे वा वर्णन आहेत ते तुम्ही दाखववावे. तसेच ते कथित बिल्डर हे बिल्डर असल्याचे योग्य पुरावे व तशी त्यांची बांधकामे, प्रोफाइल ही दाखववावा.**

v) तुमचे पुढील विधान- ***"...मी, रोशनी आम्ही त्यांना (मला) कोर्टात सोडवायला गेलो..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे कि- सदर विधानही हेतुपरस्पर खोटे व लोकांची माझेप्रती दिशाभूल करणारे आहे. तुम्ही आम्हाला कोर्टात सोडवण्याचे उद्देशाने **आलाच नव्हता** तसेच तेथे येऊन तुम्ही लोकांनी माझे जामिनासाठी तसेच जामीन मंजूर झाल्यावर त्याचे रक्कमेसाठी **काहीच केले नाही.** तसेच याउलट आदल्या रात्री तुमचे कथित 'बिल्डर'चे सांगणेवरून भ्रष्ट पोलिसांनी मला माझे हात-पाय सुजून काळे-निळे होईपर्यंत मारले होते त्याच अवस्थेत आम्हाला कोर्टाचे लॉकअपमध्ये ठेवले होते तेथे आम्हाला **न भेटता** तसेच सोडून तुम्ही, रोशनी त्या कथित बिल्डर म्हणजेच त्या नमूद झोपडीदादा गुंडांसोबत भांडुपमध्ये **फिरत होता** जी गोष्ट तिथे उपस्थित पत्रकार व काही IAC कार्यकर्त्यांना खटकली होती.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात सदर तुमच्या या विधानावर ही पुरावे व स्पष्टीकरण द्यावे.**

vi) तुमचे पुढील विधान- ***"...तेव्हा आम्हाला माहित पडले कि हा माणूस नुसता RTI टाकून पैसे वसूल करतो..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे कि येथील संपूर्ण **मुद्दा क्र. 3** मध्ये नमूदनुसार मी तुमचेविरुद्ध केलेल्या सर्व गंभीर दखलपात्र फौजदारी तक्रारीमुळे तुमचा माझ्यावर प्रचंड राग होता म्हणून तसेच तुम्हाला माझ्याकडून दि. **06/03/2024** रोजी प्राप्त नमुद 75 प्रश्नांचे प्रत्रात H मुद्द्यामध्ये नमूद सर्व सत्य ज्ञात असूनही साक्षीदार संरक्षण कायद्याचे फौजदारी भंग करत तुम्ही माझे खच्चीकरण, बदनामी करणेहेतु तसेच माझे सन्मान, जीवित व स्वातंत्र्य यांना धोका पोहोचवणेसाठी तसेच मला धमकवण्यासाठी तुम्ही हे हेतुपरस्पर खोटे, बनावटी व लोकांचे माझेप्रती दिशाभूल करून प्रतिमामलिन करण्यासाठी सदर विधान केलेले आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात मी कोणते RTI टाकून कोणाकडून कसे पैसे वसूल केले त्याचे पुरावे व वर्णन हे तुम्ही मला दाखवावे.**

vii) तुमचे पुढील विधान- ***"... तेही मी काही केले नाही, मी फक्त स्वतःला डिस्टन्स केले..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे कि- माझेबाबत लोकांची नकारात्मकरित्या दिशाभूल करण्यासाठी तुम्ही हे हेतुपरस्पर खोटे विधान केलेले आहे. याउलट तुम्ही लोकांनीच मुद्दा क्र. **3, iii) व iv)** मध्ये नमूदनुसार सदर नमूद झोपडीदादा गुंडांचे संगनमताने जे माझेवर सदर पोलीस केस, थर्ड डिग्री अत्याचार घडवले ही बाब लोकांना व इतर IAC कार्यकर्त्यांना माहीत पडू नये याची **काळजी** तुम्ही, प्रीती शर्मा मेनन, मयांक गांधी, नरेश ठाकूर हे सर्वजण घेत होता. यासाठी सदर केस झाल्याचे पाच महिन्यानंतरही तुम्ही मला **"नितीन नको ना असा लिहू, काही प्रॉब्लेम असेल तर भेटून trash out कर", "मला भेटायला कृपया घरी या"** या आशयाचे समझोत्याचे SMS इंग्रजी भाषेत पाठवले. प्रीती शर्मा मेनन, नरेश ठाकूर हेही काही IAC कार्यकर्त्यांसह माझी समजूत घालण्यासाठी मुलुंडमध्ये **आले होते**. मयांक गांधी व नरेश ठाकूर हेही सदर केसनंतर मी मागे हटण्यासाठी वारंवार माझी **समजूत घालत होते**. नरेश ठाकुरने सदर केसनंतर **जून 2012** व **ऑक्टोबर 2012** मध्ये मला आंदोलनात सहकार्य देण्यासाठीचे SMS पाठवले. माझ्यावर नमूद केस झाल्यानंतरही दुसरे दिवसापासून मी IAC चे मीटिंगचा हिस्सा होतो तसेच माझी भाषणेही तेथे व्हायची तसेच माझ्या पुढाकाराने IAC चे आंदोलनेही व्हायची. जर मी काही चुकीचे कार्य केले व तुम्ही मला डिस्टन्स केले तर हे सर्व काय व का होते? **असा प्रश्न आहे**. तुम्हास माझ्याकडून प्राप्त नमूद 75 प्रश्नांचे पत्रात H मुद्द्यांमध्ये याबाबतीत सर्व घटनाक्रम हा पुराव्यांसह नमूद आहे जे मान्य असल्यानेच तुम्ही यावर काहीच उत्तरे दिली नाहीत.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात तुम्ही या विधानाचे पुरावे व स्पष्टीकरण द्यावे.**

viii) तुमचे पुढील विधान- ***"...जेव्हा ते बिल्डर इंडिया अगेंस्ट करप्शनचे ऑफिसला आले तेव्हा प्रीती शर्मा मेननने एक लेटर issue केले होते कि आम्ही असे बिल्डर- बिल्डर विरुद्ध लढत नाही. आमचा लढा सरकारविरुद्ध आहे. जनलोकपाल बिलसाठी आहे. त्यामुळे असे issue केलेले लेटर आम्ही केलेले नाहीत..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे कि तुम्हा लोकांचे नमूद गुन्हे लपवण्यासाठी व माझेप्रती लोकांची नकारात्मकरित्या दिशाभूल करण्यासाठी तुम्ही हेतुपरस्पर खोटे व दिशाभूल करणारे हे विधान केले आहे.

याउलट तुम्ही, प्रीती शर्मा मेनन, मयांक गांधी, प्रफुल वोरा, नरेश ठाकुर या लोकांनीच तुमचे कथित बिल्डर म्हणजेच नमूद झोपडीदादा गुंडांचे साथीने माझ्यावर **एप्रिल 2012** मधील नमूद केस रचणेसाठी प्रोटोकॉल नियम तोडून माझे नकळत प्रफुल वोरांमार्फत इंडिया अगेंस्ट करप्शन चे लेटरहेडवर **09/03/2012** रोजी BMC ला खोटे विधान करणारे पत्र दिले कि **'हमीद सरवैया हा आमचा कार्यकर्ता नाही आहे.'** यानंतर मी याबाबत नाराजगी व पुढील धोका हा व्यक्त केल्यावर दि. **19/03/2012** रोजी पुन्हा त्याच लेटरहेडवरुन BMC ला चुकदुरुस्तीचे पत्र न देता फक्त घोषणापत्र दिले कि **'मी, हमीद सर्वैया, राजा जोसेफ, मांजरेकर, स्टॅलिन सर हे सर्व IAC नागरीक समितीचे कार्यकर्ते आहेत.'** त्यानंतर तुम्हा लोकांचे नमूद कटानुसार दि. **09/03/2012** रोजीच्या नमूद पत्राच्या आधारावर खोटी कहानी रचून **19/04/2012** रोजी माझेवर व हमीद सर्वैयावर नमूद खोटी केस रचणेत आली व नमूदप्रमाणे शारीरिक अत्याचार झाले व त्याची न्युजही दि. **28/04/2012** रोजी **लोकमत** वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर तुम्ही लोकांनी इतरांचा संशय व रोष टाळणेसाठी दि. **24/05/2012** रोजी नमूद केस व अत्याचार झाल्याच्या एवढ्या उशिराने त्याच लेटरहेडवरुन BMC ला पत्र दिले कि **' हमीद सर्वैया हा आमचाच कार्यकर्ता आहे.'** याहीनंतर 2 ते 3 वेळा सदर लेटरहेडवरुन खोटी व विसंगत विधाने करणारी पत्रे तुम्ही लोकांनी माझेविरुद्ध जारी केली आहेत. अशाप्रकारे संशयास्पदरित्या, खोटेपणाने तुम्हा लोकांकडूनच माझ्यावर नमूद खोटी केस, अत्याचार व दुष्प्रचार करवण्यासाठी इंडिया अगेंस्ट करप्शन चे लेटरहेडचा गैरवापर झालेला आहे व हा सर्व घटनाक्रम तुम्हास माझ्याकडून दि. **06/03/2024** रोजी प्राप्त 75 प्रश्नांचे पत्रात H मुद्द्यांमध्ये आहे जे सत्य व तुम्हाला मान्य असल्याने तुम्ही त्यावर काहीच उत्तर देऊ शकला नाही. तसेच तुम्हा लोकांपैकी मयांक गांधी हे स्वतः लोक ग्रुपचे **बिल्डर** होते. माझ्यावर नमूद खोटी केस होण्यापूर्वी त्यांच्यावर चिराबाजार क्लस्टर घोटाळ्याचे आरोप झाले. तुम्हीही **"श्री वरद विनायक (SVV) डेव्हलपर्स"** चे

नावाने नमूदप्रमाणे जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय कर्जतमध्ये करत होता. तुम्ही लोक स्वतः त्यावेळी सर्व IAC कार्यकर्त्यांना रोड कन्स्ट्रक्शनचे RTI अर्ज सरकारी कार्यालयात दर्ज करायला सांगत होता व त्यावर पत्ता हा चकालास्थित IAC कार्यालयाचा पत्ता द्यायला लावत होता. तुम्ही स्वतःच्या कर्जतमधील नमूदप्रमाणे जमिनी वाचवण्यासाठी F.A. कन्स्ट्रक्शनविरुद्ध स्वतःची स्वार्थी, व्यवसायिक लढाई ही सर्व IAC कार्यकर्त्यांचा तसेच आम्ही उभारलेल्या जनलोकपाल आंदोलनाच्या इमेजचा वापर करुन लढत होता तेव्हा ती बिल्डर व कंत्राटदारांविरुद्धची लढाई नव्हती का? हा प्रश्न आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात प्रीती शर्मा मेनन यांनी असे कोणते पत्र जारी केले होते ते तुम्ही दाखवावे तसेच 'आम्ही बिल्डर विरुद्ध लढत नाही' असे खोटे बोललेबद्दल स्पष्टीकरण द्यावे.**

ix) तुमचे पुढील विधान- ***"... हे केल्यापासून माझेविरुद्ध व प्रिती शर्मा मेननविरुद्ध वाट्टेल ते तो माणूस (मी) बोलायला लागला, वाट्टेल ते करायला लागला, त्याला जो गोंधळ घालायला तो घालू दे..."***

यावर माझे आक्षेप व म्हणणे असे कि- संपुर्ण **मुद्दा क्र. 3** मध्ये नमूदनुसार माझे तुमचेविरुद्ध असलेले सर्व गंभीर फौजदारी तक्रारींचा राग ठेवून नागरीक संरक्षण कायद्याचा फौजदारी भंग करत तुम्ही सदर विधान हे माझेप्रती लोकांची दिशाभूल व प्रतिमामलिन करणेसाठी कि मी बेशिस्त, दंगाखोर, गोंधळ घालणारा उपद्रवी आहे हे दाखवणेसाठी केले आहे.

**तरी सदर नोटीस मिळालेचे 48 तासांचे आत मी काय वाटेल ते बोललो व काय वाटेल ते करायला लागलो व काय गोंधळ घातला त्याचे वर्णन व स्पष्टीकरण हे पुराव्यांसह करावे.**

x) तुमचे पुढील विधान- ***"... त्याचेवर दखलपात्र गुन्हे किती आहेत, दोन गुन्हे भांडूपमध्ये..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे हे कि-

a) यातील भांडूप पोलीस ठाणेतील **एप्रिल 2012** मधील गुन्हा हा तर मुद्दा क्र. **3 मधील iii) व iv)** मध्ये नमूदनुसार तुम्ही, प्रीती शर्मा मेनन, मयांक गांधी, नरेश ठाकूर, नमूद झोपडीदादा गुंडे या सर्वांनीच मुद्दा क्र. **4, viii)** मध्ये वर्णिलेनुसार इंडीया अगेंस्ट करप्शन चे लेटरहेड चा खोटा गैरवापर करुन केला व नमूदप्रमाणे माझेवर अत्याचार तसेच दुष्प्रचार हे करवले. हा सर्व घटनाक्रम तुम्हास माझेकडून दि. **06/03/2024** रोजी प्राप्त नमूद 75 प्रश्नांचे पत्रात H मुद्द्यामध्ये असूनही तुम्ही त्यावर काहीच उत्तर दिले नाही व तुम्ही मी तुमचेविरुद्ध केलेल्या

नमूद सर्व फौजदारी तक्रारींचा राग ठेवून माझे खच्चीकरण व बदनामी करणेसाठीच साक्षीदार संरक्षण कायद्याचा भंग करत सदर विधान केले, **याचे स्पष्टीकरण हे सदर नोटीस मिळालेचे 48 तासात द्यावे.**

b) तसेच दुसरा गुन्हा हाही त्याच भांडूप पोलीस ठाणेत **फेब्रुवारी 2019** मध्ये तुमचेच संगनमतातील त्याच झोपडीदादा गुंडांनी आमचे घरातील जुन्या घरगुती व मालमत्तेच्या वादांचा फायदा घेवून फुस लावून रचला आहे व माझी अगोदरच नमूद पहिल्या केसबद्दल व अत्याचाराबद्दल तुम्ही लोक, सदर झोपडीदादा गुंड व संबंधित पोलिस अधिकारी यांविरुद्ध नमूदप्रमाणे कोर्ट तसेच मानवी हक्क आयोग येथे नमुदप्रमाणे तक्रारी असल्याने त्याचा रोष ठेवून भांडूप पोलीस ठाणेचे अधिकाऱ्यांनी साहजिकच तो रचला आहे याचे भान ठेवा. **फेब्रुवारी 2019** मध्ये माझे राहते खोलीवर रात्री 11 वाजता सदर घरगुती वादातून सामूहिक हल्ला झाला ज्यात दारुच्या नशेतील हल्लेखोराकडून माझे 80 % मानसिक अपंग मुलीवर पाय ठेवण्याचा प्रयत्न झाला, मला व माझे पत्नीला रक्तबंबाळ केले गेले याची माझ्याकडे Live video तसेच माझ्या कंट्रोल रुम 100 वर पहिला कॉल असूनही माझी व माझे पत्नीची तक्रार नाकारून उलट माझ्याविरुद्ध गुन्हा दर्ज केला गेला. मी त्याचवेळी याही प्रकरणी फौजदारी तक्रार ही दिलेली आहे. याप्रकरणी कोर्टात साक्षी, फेरतपासणी चालू असल्याने तुम्ही याही केसवर परिणाम करण्यासाठी तसेच त्यात खच्चीकरण करण्यासाठीच जाणून-बुजून त्याही केसचे वर्णन हे माझे बदनामीसाठी केले व अशाप्रकारे याआधीही नमूद केलेप्रमाणे साक्षीदार संरक्षण कायद्याचाही भंग केला आहे.

**तरी यावरही तुम्ही सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात योग्य स्पष्टीकरण द्यावे.**

xi) तुमचे पुढील विधान- ***"...एक (अदखलपात्र गुन्हा) दहिसर पोलीस स्टेशनमध्ये..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे हे कि- संपूर्ण **मुद्दा क्र. 3** मध्ये नमूदनुसार तुमचेविरुद्ध मी केलेल्या सर्व गंभीर फौजदारी दखलपात्र तक्रारीमुळे व्यथित होऊन तुम्ही त्या रागाचे पोटी साक्षीदार संरक्षण कायद्याचा फौजदारी भंग करत माझे खच्चीकरण, बदनामी करणेहेतू तसेच मला सर्वत्र गुन्हे करणारा गुन्हेगार दाखवून माझे सन्मान, जीवित व स्वातंत्र्यास धोका पोहोचवणे हेतू तसेच मला धमकावणेहेतू हेतुपरस्पर हे खोटे विधान केले आहे. मी तुम्हाला यावर **मुद्दा क्र. 2** मध्ये नमूदनुसार व्हाट्सअप द्वारे मेसेज पाठवला त्यात मी हाही प्रश्न विचारला होता व FIR ची प्रत दाखवण्यास सांगितले असता तुम्ही मला Block करुन पलायन केले याचे भान ठेवावे. उलट तुमचेच कथित बिल्डर म्हणजेच त्या नमूद झोपडीदादा गुंडाला रॉबरी करतेवेळी आपले टोळी व पिस्तूल, चॉपरसारख्या प्राणघातक

शस्त्रांसह त्याच दहिसर-बोरिवली परिसरात रंगेहात पोलिसांनी अटक केल्याची बातमी वृत्तपत्रात झळकली होती याचे भान ठेवावे.

**तरी तुमचे विधानानुसार माझेविरुद्ध दहिसर पोलीस ठाण्यात गुन्हा असल्यास त्याची FIR ची प्रत ही नोटीस मिळाल्याचे 48 तासात दाखवण्याची जबाबदारी ही तुमची आहे याची नोंद घ्यावी.**

xii) तुमचे पुढील विधान- ***"...दखलपात्र गुन्हे पाच..त्याच्यावर चॅप्टर केस झाली..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे असे आहे- यातील दोन दखलपात्र तक्रारी या तर मुद्दा क्र. **4, x) मधील b)** मध्ये नमूदनुसार प्रकरणातील हल्लेखोरांपैकी दोन व्यक्तींनी खोटेपणाने आहेत. याच प्रकरणी ते दोन व्यक्ती व माझेविरुद्ध चॅप्टर प्रॉसिडींग म्हणजे शांतता कारवाई चालू झाली ज्यात मी बाँड भरणेस स्पष्ट नकार देणारी माझी लेखी बाजू पुराव्यांसह मांडूनही त्यावर काहीच उत्तर न देता संबंधित पोलिसांनी खोटेपणाने अशा बॉण्डवर माझ्याकडून सही घेतली ज्यात त्या विरोधी व्यक्तींनाच माझा जामीन बनवला गेला व त्यांचा जामीन मला बनवला गेला.

यानंतर **सन 2020** मध्ये मी चार झाडे वाचवण्यासाठी बेकायदेशीर व भ्रष्टाचार झालेल्या ओपन शेडची तक्रारी करतो याचा राग ठेवून संबंधित खासदाराच्या राजकीय गुंडांनी माझे घरावर रात्री बारा वाजता **सामूहिक हल्ला** केला. त्याचे Live video असतानाही त्याच भांडुप पोलीस ठाण्याचे अधिकारी हे FIR घेतच नव्हते व आजतोपर्यंत घेतली नाही. यातही माझा संशय असा कि सदर खासदाराशी तुमचे **राजकीय संबंध** असल्याने या कारणाने माझ्यावर हा हल्ला झाला असावा. तुमच्या कथित 5 अदखलपात्र तक्रारीपैकी दोन तक्रारी या त्या हल्ल्यातीलच दोन हल्लेखोरांनी खोटेपणाने केलेल्या आहेत याचे भान ठेवा. ही बाब तुमचे समर्थक **श्री. गोरंग वोरा** यांनाही माहित आहे व तेही त्यावेळी सोशल मीडियात यावर माझे बाजूने बोलत होते. म्हणजे जिथे एक दक्ष नागरिकाचे व सामाजिक कार्यकर्त्याचे भ्रष्टाचार व अन्यायाविरुद्ध लढायचे कर्तव्य पार पाडताना माझेवर नमूद ज्या केसेस, अत्याचार, हालअपेष्टा पदरी पडल्या त्याबद्दल प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याने माझे कौतुक करून प्रोत्साहन द्यायला हवे तेथे तुम्ही माझ्यावरील केसेसचा उल्लेख अत्यंत हीन व बदनामीकारकरित्या करताना दिसता यावरून हेच दिसून येते कि तुम्ही कोणी सामाजिक कार्यकर्ता नसून माझे तुमच्याविरुद्धच्या नमूद सर्व फौजदारी तक्रारींनुसार दोषी आहात व या तक्रारींचा राग ठेवूनच साक्षीदार संरक्षण कायद्याचा भंग करत तुम्ही हेतूपरस्पर सर्व सत्य माहित असूनही फक्त माझे खच्चीकरण व बदनामी करून मला एकप्रकारे धमकवण्यासाठीच हे विधान केलेले आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात यावरही मला स्पष्टीकरण द्यावे.**

xiii) तुमचे पुढील विधान- ***"...असा माणूस माझ्नेविरुद्ध ED, CBI ला चौकशी व्हावी म्हणून लिहितो..."***

यावर माझा आक्षेप व म्हणणे हे कि- हेही विधान तुम्ही माझे तुमचेविरुद्धचे नमूद सर्व गंभीर फौजदारी तक्रारींमध्ये माझे खच्चीकरण व बदनामी करण्यासाठी, लोकांना मी नकारात्मक व्यक्ती दाखवण्यासाठी साक्षीदार संरक्षण कायद्याचे भंग करत केले आहे, **यावरही ही नोटीस मिळाल्याचे 48 तासात उत्तर द्यावे.**

5) या व्यतिरिक्त नमूद न्यूज़ चॅनल यांचीही कृती व भूमिका ही **अनैसर्गिक** व **अनाकलनीय** दिसून येते ती अशी-

i) **एबीपी माझा** या न्यूज़ चॅनलने **सन 2013** मध्ये मी परेलमध्ये IAC कार्यकर्त्यांची सभा घेऊन त्यात तुमचे नमूद कर्जत जमीन घोटाळ्याची माहिती दिली ती बातमी **एबीपी माझा** न्युज चैनलने **प्रसारित** केली ज्यावर तुम्ही **निरुत्तर** राहिला. त्यानंतर **सन 2015** मध्ये महाराष्ट्र रिवेन्यू ट्रिब्युनलमधून तुमची नमूद शासनजमा झालेली जमीन तुम्हाला नमूदनुसार संशयितरित्या प्राप्त झाली ज्याची बातमी ही तुम्ही लोकांपासून लपवून ठेवू इच्छित होता ती बातमी मी **एबीपी माझा** च्या पत्रकारास दिली तरीही **एबीपी माझा** ने ती बातमी प्रसारित करण्याचे टाळले व त्यानंतर तुमचेसारखे जमीन घोटाळ्यांचे पुरावेंसह तक्रारी व आरोप असणाऱ्या दोषी व्यक्तीला त्यांनी "लेडी ऑफ इयर" अवॉर्ड दिला होता. हे त्यांचे कृत्य **अनैसर्गिक** व **अनाकलनीय** दिसून येते.

ii) तसेच **Tv 9 मराठी** न्यूज़ चॅनलनेही **फेब्रुवारी 2014** मध्ये तुमचा नमूद जमीन घोटाळा उजागर करणारी माझी मुलाकात ही भांडुपमध्ये घेतली व दुसरे दिवशी मी मनाई करूनही विनंती करून मला कर्जतमध्ये त्यांचे गाडीमधून घेऊन जाऊन तेथे तुमचेपासूनचे पीडित शेतकऱ्यांचीही मुलाकात घेतली. पण त्यांनीही ती बातमी आपले न्यूज चॅनलवर प्रसारित करताना त्यात फक्त माझी मुलाकात दाखवून त्या शेतकऱ्यांची मुलाकात दाखवलीच नाही. तरी त्या न्युजवरही तुम्ही निरुत्तरच राहिला. नंतर सदर बातमी ही त्यांचे Youtube वरुन गायब झाली. हे त्यांचे कृत्य **अनैसर्गिक** व **अनाकलनीय** दिसून येते.

iii) याचा अर्थ वरील न्यूज़ चॅनल हे त्यांचे गरजेनुसार तुमचे भ्रष्टाचाराची पोलखोल करणारे माझी मुलाकात हे प्रसारीत करत होते. पण यावेळी मी दि. **22/05/2024** रोजी मुद्दा क्र. **3, viii)** मध्ये वर्णिलेनुसार नमूद प्रेस कॉन्फरन्स मुंबई मराठी पत्रकार संघ येथे घेतली त्याचे निमंत्रण हे माझे तुमचेविरुद्धच्या सर्व पुराव्यांसहितचे तक्रारी व आरोप यांचे वेबसाईटचे लिंकसहित सर्व न्यूज़ चॅनलसह नमूद तिन्ही न्यूज़ चॅनलनाही त्यांचे अधिकृत ईमेलवर म्हणजेच **zee24taasonline@gmail.com,, response@tv9.com,,**

**assign_marathi@abpnews.in** यांवर दि. **21/05/2024** रोजी पाठवले पण तरीही यामध्ये नमूद न्यूज चॅनलचे प्रतिनिधी आलेच नाही. जर त्यांना माझ्याविरुद्ध सदर न्यूजच चालवायची होती तर त्यांनी अगोदर या प्रेस कॉन्फरन्सला यायला पाहिजे होते.

तसेच दि. **03/07/2024** रोजी ही सदर ईमेलमध्येच reply मध्ये तुमचे नमूद जमीन घोटाळ्यांचे पुरावेंसहित घेतलेल्या सदर प्रेस कॉन्फरन्सची संपूर्ण व्हिडिओ ही वर्णनासहित पाठवली.

तसेच दि. **06/07/2024** रोजीही मुद्दा क्र. **3, xii)** मध्ये नमूद विधानसभेबाहेरील आंदोलनाचीही बातमी ही व्हिडिओसहित सदर ईमेलचे reply मध्ये पाठवली.

तसेच दि. **11/07/2024** रोजीही सदर विधानसभेवरील आंदोलनाची व्हिडिओसहित बातमी महाराष्ट्रातील कोट्यावधी लोकांनी पाहिल्याची बातमीही सदर ईमेलमध्ये reply मध्ये पाठवली. पण तरीही नमूद न्यूज चॅनलनी तुमच्याविरुद्धच्या या बातम्यांची साधी दखलही घेतली नव्हती. पण माझेविरुद्ध तुम्ही केलेली खोटी, अपमानजनक व बिनबुडाची विधाने ही मात्र सदर न्यूज चॅनलने एकतर्फा प्रसारित केली. हे त्यांचे तमाम कृत्य हे **नैसर्गिक** व **अनाकलनीय** दिसून येते.

iv) पण याउलट सदर न्यूज चॅनलनी तुम्हाला विशेष वागणूक देत तुमचे आलिशान घरी येऊन नमूदप्रमाणे तुमची माझेविरुध्दची प्रेस कॉन्फरन्स कव्हर केली व त्यात सर्रासपणे माझ्याविरुद्धची हेतूपरस्पर खोटी, बदनामीकारक व लोकांची माझेप्रती दिशाभूल करणारी विधाने प्रसारीत करताना पत्रकारितेचे नियम, **नैतिकता, तत्वे, प्रामाणिकपणा व निष्पक्षता** यांचे पालन हे केलेलेच नाही व जणूकाही तुमची व तुमचे राजकीय वरदहस्तांची सुपारी घेऊन तुम्ही जे वाटेल ते विनापुरावे व विनाआधार माझेविरुद्ध खोटे, बदनामीकारक, एकतर्फारित्या बोलला ते न तपासता अंधपणे प्रसारित केले व माझी तुमच्याविरुद्ध ED मध्ये नेमक्या काय तक्रारी आहेत तसेच त्यावर तुमचे मुद्देसूदरित्या काय उत्तरे आहेत याबद्दल तुम्हाला नैसर्गिकरित्या एकही प्रश्न न विचारलेचे दिसून आले तसेच याबाबत माझेही बाजू वा मुलाकात घेतली नाही. याबाबत लोकांमध्ये व माझेमध्ये **संशय** निर्माण झालेला आहे याची सदर न्यूज चॅनलनी **दखल घ्यावी.**

v) तसेच याव्यतिरिक्त महत्वाचे म्हणजे सदर तिन्ही न्यूज चॅनलचे नमूद प्रेस कॉन्फरन्स दाखवणारे त्यांचे Youtube मध्ये माझे उत्तरादाखल केलेले comments ही संशयास्पदरित्या 2 ते 3 मिनिटात गायब झाले जेणेकरुन माझ्या तुमच्याविरुद्धच्या नमूद तक्रारी व आरोप हे लोकांपर्यंत पोहोचलेच नाही पाहिजेत.

vi) याचा अर्थ व निष्कर्ष असा कि आज महाराष्ट्रात कुळ कायद्याचा भंग करत शेतकरी नसतानाही किंवा घरबसल्या राजस्थानचे बोगस शेतकरी प्रमाणपत्र बनवून त्याआधारे येथील गरीब शेतकऱ्यांच्या

शेतजमिनी भ्रष्ट मार्गाने खरेदी करून त्या व्यवसायिक व चंगळवादी उद्देशाने अन्य बाह्य शहरी श्रीमंतांना विकण्याचा धंदा हा धनाढ्य भूमाफिया लोकांकडून सर्रासपणे चालू आहे जो एकप्रकारे संविधानाची उद्दिष्टे तसेच देशाची अन्नसुरक्षा धोक्यात आणणारा **देशद्रोही गुन्हा** आहे. सदर गुन्ह्यांबद्दल मी तुमचेविरुद्ध गेली 12 वर्षांपासून पुरावेंसह नमूद तक्रारी केल्या तसेच नमूद **मनी लॉन्ड्रिंग, टॅक्सचोरी,** त्याचे साक्षीदाराला पोलीस ठाण्यात बेकायदेशीररित्या दोन दिवस **detain** व **interrogation** करणे व त्यात त्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्यावर उलट त्याच्यावरच खोटी केस रचणे इत्यादी तुमच्या अतिगंभीर गुन्ह्यांचेही सहपुरावे तक्रारी केल्या. पण अशा बातम्या या जनहितार्थ नमूद न्यूज चॅनल हे प्रसारितच करणार नाही व उलट तुम्हाला समाजसेवी दाखवणार तसेच याउलट सदर जनहितार्थ तक्रारी करत असल्यामुळे सन 2012 पासून नमूदप्रमाणे खोट्या पोलीस केसेस, अत्याचार, हालअपेष्टा, स्वतःची 7 महिनेची मुलगी गमावणे असे परिणाम भोगणाऱ्या एका सामान्य सामाजिक कार्यकर्त्याला म्हणजेच मला आणखी धमकावण्यासाठी व **खच्चीकरण** करण्यासाठी तुमची साथ देणार, तुम्ही माझेविरुद्ध नमूद खोटी व दिशाभूल करणारी प्रेस कॉन्फरन्स घरबसल्या घेता तेव्हा तेच न्यूज चॅनल हे त्याची काही तपासणी न करता अंधपणे त्या प्रसारित करणार ही एक प्रकारे त्यांची लोकांवर दादागिरीच आहे. मा. सुप्रीम कोर्टाचे एका निर्णयानुसार सामाजिक कार्यकर्ता, ऍक्टिव्हिस्ट हे प्रेशर कुकरचे **व्हॉल्वप्रमाणे** असतात जे देशाला वाचवत असतात तसेच त्यांचेच दुसऱ्या एका निर्णयानुसार अशाप्रकारचे अनैसर्गिक, संशयास्पद व अनाकलनीय कृती या **"लेनदेन"** झाल्याचे स्पष्ट करतात असे आहे.

vii) नमूद न्यूज चॅनल व मीडिया यांनी **आत्मचिंतन** करावे कि त्यांचे कर्तव्य हे खऱ्या गुन्हेगारांचा पर्दाफाश करणे, कटू सत्य दाखवणे, ताकदवरांपासून पिडीतांना न्याय मिळवून देणे हे आहे, त्याचे उलट कार्य करणे नव्हे. तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात त्यांनीही त्यांच्यासाठीच्या **मुद्दा क्र. 5** मधील सर्व उपमुद्द्यांचे तसेच मुद्दा **क्र. 4** मधील सर्व उपमुद्द्यांमध्ये विचारणा केलेले **पुरावे, उत्तरे, खुलासे व स्पष्टीकरण** हे श्रीमती अंजली दमानिया म्हणजे तुमच्याकडून घेऊन किंवा स्वतः द्वारे लोकांना व मला द्यावे तसेच त्यांनी याप्रकरणी माझेद्वारे नमूद संपूर्ण सत्य हे त्यांचे माध्यमांतून जनहितार्थ लोकांपर्यंत येऊ द्यावे व लोकांना ठरवू द्यावे की काय सत्य आहे व काय असत्य व खोटे आहे अन्यथा मला माझे, माझे कुटुंब, माझे आत्मसन्मान, अस्तित्व,जीवित व स्वातंत्र्य यांचे रक्षणासाठी त्यांचेविरुद्ध **BNS चे कलम- 356, IT ॲक्टचे कलम- 67, साक्षीदार संरक्षण कायदा** इत्यादीअन्वये तक्रारी व विहीत प्रक्रिया करण्याचे प्रावधान आहे याची त्यांनी नोंद घ्यावी. तरी त्यांनी यावर **सकारात्मकरित्या विचार करावा हीच अपेक्षा.**

6) मी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून पहिलेपासूनच अन्यायाविरुद्ध लढतो, लिखाण करतो, आंदोलनात सक्रीय असतो तसेच गेली अनेक वर्षांपासून नागरी, पर्यावरण, मानवी हक्क इत्यादी विषयांवर कार्य करतो, पिडीतांची मदत करतो याची माझ्याकडे अनेक उदाहरणे व पुरावे आहेत. जेव्हा **26 नोव्हेंबर 2008** रोजी मुंबईवरील आतंकी हल्ल्यात आमचे वीर पोलीस शहीद झाले तेव्हा मी विभागात **"रडू नको भारत माते जोवर या देहावर खाकी आहे, हा देह गेला तरी पुढचा जन्म अजून बाकी आहे"** या वाक्याचे बॅनर लावून लोकांना 31 डिसेंबरची पार्टी साजरी न करण्याचे आवाहन केले होते. हे सर्व करायला रक्तातच **संवेदनशीलता** असावी लागते. पण या शोककळेतही कर्जतमध्ये तुमचे नमूद जमीनखरेदीचे **फेरफार** बनत होते. आज मी कसाबसा आपले 80 % मानसिक अपंग मुलीवर इलाज करून प्रतिकूल हालातमध्येही आपले कार्य करत आहे. तुम्ही माझेबाबतीत अत्यंत तुच्छतेने **"हा हरिश्चंद्रचा अवतार.."** बोलताना याचे भान ठेवावे कि हरिश्चंद्रांना त्यांचे मेलेले मुल व वैभव हे शेवटी देवांनी त्यांना परत केले पण तुम्हा सर्व लोकांचेमुळे जे माझेशी वाईट झाले ज्यात मी माझी मुलगी व इतर मुल्ये गमावली ती मला परत मिळाली नाहीत.

तुम्ही या नमूद प्रेस कॉन्फरन्सद्वारे माझे प्रतिमामलीन करून मला त्याचा प्रचंड मानसिक व इतर त्रास देण्याचा तुम्ही प्रयत्न केला आहे तसेच माझे संबंधित मूलभूत अधिकारांचीही हिंसा केली आहे.

**तरी सदर नोटीस मिळाल्याचे 48 तासात तुम्ही मुद्दा क्र. 4 मधील सर्व उपमुद्यांमध्ये विचारणा केलेले पुरावे, उत्तरे व स्पष्टीकरण मला द्यावे**

अन्यथा माझी ही नोटीस, त्यातील सर्व मुद्दे व आरोप मान्य करत त्यावर बिनशर्तपणे लेखी माफीनामा द्यावा तसेच प्रेस कॉन्फरन्स घेऊन माझे समक्ष सर्व न्यूज चॅनलवर त्याबाबत माफी मांगावी व यापुढे अशी चूक न करण्याचे वचन द्यावे

अन्यथा मला माझे, माझे कुटुंब, माझे आत्मसन्मान, अस्तित्व, जीवित व स्वातंत्र्य यांचे रक्षणासाठी तुमचेविरुद्ध **BNS चे कलम- 356, IT ॲक्टचे कलम- 67, साक्षीदार संरक्षण कायदा** इत्यादीअन्वये तक्रारी व कायदेशीर प्रक्रिया करण्याचे प्रावधान आहे तसेच सर्वप्रकारे **नुकसानभरपाई** मिळण्याचे प्रावधान आहे तसेच या सर्व नमूद मुद्द्यांवर व्यापक जनहितार्थ लोकांमध्ये जनजागृती व सत्याग्रह करण्याचेही प्रावधान आहे व त्यांची मी यापुढे कोणतीही सूचना न देता अंमलात आणू शकतो **याची नोंद घ्यावी.**

श्री. नितीन ब. चव्हाण